# बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि. २८ डिसेंबर २०२२

### जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६२७/२०२२ भादंविसक ३७९ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २२/१२/२०२२ रोजी १९.०० वा चे सुमारास, किडवाई चौक, सबजेल च्या भिंतीलगत, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २७/१२/२०२२ रोजी २२.२८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सचिन शिवशंकर अक्कलकोटे, वय- ४२ वर्षे, रा. ६६७, उत्तर कसबा गवंडी गल्ली, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ६०,०००/- रु ग्रे रंगाची होन्डा शाईन मोटार सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची मोटार सायकल क्रं. एम एच १३ डी आर ७३५७ ही वरील ठिकाणी हॅन्डल लॉक करुन पार्क केली असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या संमतीवाचुन, मुद्दाम लबाडीने हॅन्डल लॉक तोडुन अगर डयुप्लीकेट चावीचा वापर करुन चोरुन नेली आहे म्हणून. तपास:- पोना/ १३८१ गंगावणे - ७४९९१०१३९१ |

### एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६८४/२०२२ भादंविसक ४२०,४०८ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि.०८/०२/२०२२ रोजी पासुन ते जुन २०२२ रोजी पर्यंत, मुद्रासन सिटी कॉलनी, अक्कलकोट रोड, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २७/१२/२०२२ रोजी २०.२६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | प्रविणकुमार प्रेमनाथ शिंदे, वय- ३४ वर्षे, व्यवसाय- भारत फायनान्सचे मॅनेजर, रा. ३२६, किर्तीनगर, अक्कलकोट रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | संतोष श्रीनिवास जाधव, फिल्ड असिस्टंट |
| **फसवणुक रक्कम** | : | ३,४५,५१७/- रुपये असे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे वरील ठिकाणी भारत फायनान्स कंपनी येथे ब्रांच मॅनेजर या पदावर नोकरीस आहेत. वरील आरोपीत हा फिल्ड असिस्टंट म्हणून नियुक्तीस आहे. फिर्यादीचे कंपनीद्वारे होणाऱ्या लघुउदयोगासाठी कर्ज वाटप केले जाते. यामध्ये ज्यांना कर्ज वाटप करण्या आले आहे त्यांचे ७ दिवसाच्या आत कर्जाचे हप्ते कर्जदारांच्या घरी जावून गोळा करण्याचे काम दि. ०१/१०/२०२१ रोजी पासुन वरील आरोपीतास देण्यात आले होते. त्याने जानेवारी २०२२ पर्यंत कर्जदार सदस्याकडुन मिळालेले कर्जाचे हप्ते सुरळीत घेवून कंपनीमध्ये भरत होता. त्यांनतर दि. ०३/०६/२०२२ रोजी कंपनीकडुन सरप्राईज व्हिजीट ठेवण्यात आली. त्यामध्ये फिर्यादीच्या अशे निदर्शनास आले की वरील आरोपीताने वरील कालावधीत सदस्यांकडुन घेतलेली वरील वर्णनाची रक्कमेबाबत विचारणा केली असता त्याने कंपनीचे पैसे भरण्यास नकार दिला व सांगितले की पैसे माझ्याकडुन खर्च झाले. माझेकडे पैसे नाहीत असे सांगितले आहे म्हणून. तपास:- सपोनि/ कुकडे - **९५७९३९९५५३** |